# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- `29.09.2025** **वार-सोमवार**

---

**अजितपवार**

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील मुळा, मुठा, पवना आणि इंद्रायणी नदीवर राबवण्यात येणाऱ्या नदी सुधार प्रकल्पांबाबत आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी संगणकीय सादरीकरणाद्वारे मुळा नदीवर राबवण्यात येणाऱ्या नदी सुधार प्रकल्पाच्या आराखड्याचं सादरीकरण करण्यात आलं. हा आराखडा राबवताना जलसंपदा विभागाच्या सूचनांचा प्राधान्याने विचार करण्याचे निर्देश अजित पवार यांनी दिले. अजित पवार यांनी आज अन्य एका बैठकीत पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या प्रतिनिधींसमवेत चर्चा केली.

**पदवीप्रदान**

पदवी मिळवणं म्हणजे समाजासाठी काम करण्याच्या प्रवासाची खरी सुरुवात आहे असा संदेश राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विद्यार्थ्यांना दिला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२६व्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. २०४७पर्यंत विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पपूर्तीमध्ये तरुणाईची भूमिका निर्णायक ठरेल, असं पाटील म्हणाले. प्राध्यापक डॉक्टर अनिल सहस्रबुद्धे या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू पराग काळकर, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या समारंभात ७८ हजार ६०९ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र, १९ हजार ५७७ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलं. विविध विद्या शाखांमधील ५४ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्रदान करण्यात आलं.

**ऊसगाळपहंगामउशिर**

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे यंदाचा ऊस गाळप हंगाम २५ ऑक्टोबर किंवा १ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात मंत्री समितीची बैठक होणार असून यात यंदाच्या गाळप हंगामाचे धोरण निश्चित केले जाणार आहे. ऊस पिकाखाली किती क्षेत्र आहे आणि गाळपासाठी प्रत्यक्षात किती ऊस उपलब्ध होईल, याची आकडेवारी देखील या बैठकीत जाहीर होईल. कृषी विभागानं दिलेल्या माहितीनुसार १२ ते १३ लाख हेक्टरवर ऊसाची लागवड झाली आहे. त्यामधून साखर कारखान्यांना गाळपासाठी १२शे ते १२ शे ५० लाख मेट्रिक टन ऊस उपलब्ध होईल, असा अंदाज आहे.

**स्वच्छशहर**

गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालयाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या “स्वच्छ शहर जोडी उपक्रमात” सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मार्गदर्शक शहरांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवड झाली आहे. या उपक्रमांतर्गत काही नागरी स्थानिक स्वराज्य

संस्थांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महापालिकेला देण्यात आली आहे. त्यानुसार मंचर, सुरगाणा आणि लांखादूर नगरपंचायत, तसंच आळंदी आणि जामखेड नगरपरिषदेला पिंपरी चिंचवड महापालिका मार्गदर्शन करणार आहे. या नगरपरिषदांच्या घनकचरा व्यवस्थापन, कचरा विलगीकरण, संकलन आणि प्रक्रिया प्रणालींचा पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सविस्तर आढावा घेतला.

**वाहतूककोंडी**

पुणे शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी महापालिका, शहरातील ३२ रस्ते आणि २२ चौकांमध्ये सुधारणा करणार आहे. प्रमुख रस्त्यांवर आणि चौकांमध्ये अडथळा ठरणारे अनावश्यक पादचारी मार्ग कमी केले जाणार आहेत; मात्र सुधारणा करताना या संदर्भातील नियमावलीत सांगितलेल्या निकषांपेक्षा पादचारी मार्ग लहान होणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असं पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी स्पष्ट केलं.

**पीएमपीबस**

पीएमपीच्या ताफ्यात नव्या 12शे बस दाखल होणार आहेत. यासाठी पीएमपी प्रशासनाला 8 ते 10 नव्या आगरांची आणि बस स्थानाकांची आवश्यकता आहे. यासाठी पीएमसी, पीसीएमसी आणि पीएमआरडीएच्या हद्दीतील आरक्षित जागांची पीएमपी प्रशासनाकडून चाचणी सुरू आहे.

**कात्रज डेअरी**

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या वतीने कात्रजच्या मुख्यालयावर डेअरी विस्तारीकरणाचा अत्याधुनिक प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पामुळे संघाची दूध प्रक्रिया क्षमता ३ लाख लिटरपर्यंत वाढणार आहे. दीड वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प असल्याचं पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष स्वप्नील ढमढेरे यांनी सांगितलं.

**सॅनिटरीनॅपकिन**

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने स्वरूपवर्धिनी संस्थेच्या किशोरी विकास प्रकल्पांतर्गत वस्ती भागातील १२० मुलींना रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजच्या वतीने 9 हजार सॅनिटरी नॅपकिन वितरित करण्यात आले. यावेळी मुलींना मासिक पाळीबाबत मार्गदर्शनही करण्यात आलं.

**प्रकाशन**

प्रादेशिक चित्रपटांची अनोखी सफर घडवणाऱ्या 'लाईमलाईट प्रादेशिक' या अच्युत गोडबोले आणि सतीश कुलकर्णी लिखित, पुस्तकाचं प्रकाशन काल पुण्यात ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते झालं. मनाला भिडणाऱ्या आशयघन आणि प्रादेशिक सिनेमांतील वास्तववादीपणा हे त्याचं वेगळेपण आहे, असं प्रतिपादन आगाशे यांनी यावेळी केलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण आहे, उद्याही आकाश ढगाळ राहून हलक्या ते मध्यम पावसाचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,
नमस्कार.